।। सा विद्या या विमुक्तये ।।
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपूरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

EXAMINATION SECTION
Phone: (02462) 229294 website: srtmun.ac.in e-mail: directorboee@gmail.com

संदर्भ : परीक्षा/समन्वय/२०२१-२२/२१ दिनांक : १४/०४/२०२१

# सुधारीत अत्यंत तातडीचे परीपत्रक

प्रति,
मा.प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ,
मा.प्राचार्य/तथा क्लस्टर हेड महाविद्यालय, हिवाळी-२०२० परीक्षा प्रस्तुत विद्यापीठ,
मा.संचालक, सर्व संकुले, विद्यापीठ परिसर, प्रस्तुत विद्यापीठ, ०
मा.संचालक, लातूर व परभणी, उपकेंद्र, प्रस्तुत विद्यापीठ,
मा.प्राचार्य, न्यु मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली,
मा.समन्वयक, कै. उत्तमराव राठोड आदिवासी विकास संशोधन केंद्र, किनवट.

विषय:हिवाळी-२०२०, पदवी, पद्व्युत्तर (व्यावसायिक/अव्यावसायिक अभ्यासक्रमाच्या) परीक्षेबाबत.
संदर्भ: मा.परीक्षा व मूल्यमापन मंडळाची तातडीची दिनांक १४/०४/२०२१ रोजीची बैठक.

महोदय,

उपरोक्त विषयी व संदर्भीय परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या तातडीच्या बैठकीतील निर्णयानुसार तसेच मा. कुलगुरू महोदयांच्या प्राप्त आदेशान्वये आपणास कळविण्यात येते की, कोविड-१९ या विषाणुच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे महाराष्ट्र शासनाने दिनांक १४/०४/२०२१ पासुन राज्यात कडक निर्बंध व संचारबंदी लागू केली आहे. प्रस्तुत विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमाच्या हिवाळी-२०२० च्या परीक्षा (व्यावसायिक/अव्यावसायिक) दिनांक ०६/०४/२०२१ पासुन सुरू झालेल्या आहेत, त्या जवळपास संपन्न झालेल्या असून काही अभ्यासक्रमाचे एक ते दोन पेपर शिल्लक आहेत, केवळ याच उर्वरीत राहिलेल्या पेपरच्या परीक्षा पुर्वनियोजीत वेळापत्रकानुसार घेण्यात येतील.

महाराष्ट शासनाने दिनांक १४/०४/२०२१ पासुन राजयात कडक निर्बंध व संचारबंदी लागू केली असल्यामुळे प्रस्तुत विद्यापीठाच्या हिवाळी-२०२० उर्वरीत पदवी व पद्व्युत्तर (व्यावसायिक/अव्यावसायिक अभ्यासक्रम) विद्यापीठ / क्लस्टर परीक्षा हया १२/०४/२०२१ पासुन सुरू झलेल्या व १५/०४/२०२१ व त्यापुढील तारखेस सुरू होणार असलेल्या परीक्षा संपुर्णपणे पुढे ढकलण्यात आल्या आहेत, सदर परीक्षा दिनांक ०५/०५/२०२१ नंतर सुधारीत वेळापत्रकानुसार होतील. सुधारीत वेळापत्रक व परीक्षेच्या तारखा लवकरच

विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल, तसेच क्लस्टर हेड महाविद्यालयामार्फत क्लस्टर पध्दतीने घेण्यात येणा-या परीक्षांचे वेळापत्रक प्रसिध्द करण्यात येईल, याची सर्व संबधीतांनी नोंद घ्यावी.

सदर परिपत्रक सर्व विद्यार्थ्याच्या व संबंधीतांच्या निदर्शणास आणुन देवून महाराष्ट्र शासनाच्या, स्थानिक प्रशासनाच्या व विद्यापीठाने कोविड-१९ च्या संदर्भाने वेळोवेळी केलेल्या सुचनांचे तंतोतंत पालन करून परीक्षा सुरळीतपणे पार पाडाव्यात ही विनंती.

आपला,

प्र.संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहितीस्तव:
(१) मा. कुलगुरू महोदय, प्रस्तुत विद्यापीठ
(२) मा. प्र-कुलगुरू महोदय, प्रस्तुत विद्यापीठ
(३)मा.कुलसचिव, प्रस्तुत विद्यापीठ

**प्रत माहितीस्तव तथा कार्यवाहीस्तव**
**जनसंपर्क अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ:** या परीपत्रकाची नोंद घेवून सविस्तर बातमी तयार करून चारही जिल्हयातील सर्व वृत्तपत्रात विनामुल्य प्रसिध्द करावी